पिंपरी चिंचवड महानगरपालिका
**ग** प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक - ३
सभावृत्तांत

दिनांक - ३/१०/२०१७ वेळ - दुपारी २:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **ग** प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दि.०३/१०/२०१७ रोजी दुपारी २.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे **“ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह”** येथे आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. **मा.श्री.अभिषेक गोविंद बारणे – सभापती**
२. मा.कदम निकीता अर्जुन
३. मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे
४. मा.उषा संजोग वाघेरे(पाटील)
५. पवार मनिषा प्रमोद
६. मा.बारणे अर्चना तानाजी
७. मा.कैलास ऊर्फ बाबा भालचंद्र बारणे
८. मा.निलेश हिरामण बारणे
९. मा.चंद्रकांत बारकु नखाते

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

**श्री**.श्रीनिवास दांगट- **क्षेत्रिय अधिकारी**/प्रशासन अधिकारी, श्री.संदेश चव्हाण – कार्य.अभियंता विद्युत, श्री.भाऊसाहेब साबळे –उप अभियंता पाणीपुरवठा, श्री.एस एस कुळकर्णी – सहा.आरोग्य अधिकारी आरोग्य विभाग, श्री.निंबाळकर – उपअभियंता –स्थापत्य, श्री.दिलीप धुमाळ – उप अभियंता – विद्युत, श्री.ओव्हाळ – उपअभियंता- स्थापत्य, त्याचप्रमाणे आरोग्य निरीक्षक, कनिष्ठ अभियंता इ.कर्मचारी उपस्थित होते.

-----

**मा.सभापती-** सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

------

अ) दि. ०४/०९ /२०१७ चे मासिक सभेचा सभावृत्तांत ( कार्यक्रम पत्रिका क्र. २ ) कायम करणेत येत आहे.

-------

ठराव क्रमांक - विषय क्रमांक- १

दिनांक- ३/१०/२०१७

सूचक- मा. अनुमोदक- मा.

संदर्भ – मा. उषा वाघेरे यांचे दि. २०/०९/२०१७ चे पत्र.

मा.उषा वाघेरे यांनी सादर केलेल्या पत्रानुसार पिंपरी येथील प्रभाग क्रमांक २१ मधील अयप्पा मंदिरा जवळील संडास ब्लॉक असुन वापरास योग्य नसुन सदर ठिकाणी बहुतांशी सिंधी समाज वास्तव्यास असुन त्यांचे स्वत:चे घरात शौचालय आहे, सदर संडास ब्लॉकचा वापर रहदारी वाले वापरत असल्यामुळे दुर्गंधी पसरुन रोगराई वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदर ठिकाणाच्या वास्तव्यास असणा-या नागरिकांच्या तक्रारी वरुन सदर संडास ब्लॉक पाडण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक - विषय क्रमांक- २

दिनांक- ३/१०/२०१७

सूचक- मा. अनुमोदक- मा.

संदर्भ – मा. उषा वाघेरे यांचे दि. २०/०९/२०१७ चे पत्र.

मा.उषा वाघेरे यांनी सादर केलेल्या पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मधील पी.सी.एम.सी.कॉलनी जवळ असलेले मुतारी व संडास ब्लॉक हे वापरण्यास योग्य नाहीत, तसेच जवळ परिसरात इंडस्ट्रीज एरिया असल्यामुळे निवासी मोजकीच आहेत व त्यांचे स्वत:चे शौचालय असल्यामुळे त्यांना त्याचा वापर होत नसुन, सदर ठिकाणी धुम्रपान तसेच मद्यपी लोकांचा वापर जास्त होतो, त्यामुळे सदर ठिकाणी अस्वच्छता वाढली असुन नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हानिकारक आहे, तरी सदर संडास ब्लॉक व मुतारी पाडण्याच्या ठरावास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक १ व २ बाबत चर्चा झाली असता मा.संदिप वाघेरे यांनी त्याबाबत सुचना केली की , सदर ठिकाणी असलेले संडास ब्लॉक पाडणेत येऊ नये अशी मागणी तेथील रहिवासी नागरीकांनी केलेली असुन तसा नागरीकांनी स्वाक्षरी केलेला अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झालेला आहे, तो त्यांनी सभागृहात सादर केला. तरी सदर ठिकाणी असलेल्या संडास ब्लॉकच्या जागी सुलभ शौचालय बांधणेत यावे अशा प्रकारची चर्चा झाली.

मा.अध्यक्ष यांनी आरोग्य विभाग व स्थापत्य विभाग यांनी पाहणी करुन अहवाल सादर करणेबाबत सुचना केली व त्यानुसार अहवालासह सदरचे विषय पुढील मिटींग मध्ये सादर करणेबाबत आदेश दिला.

-------

ठराव क्रमांक - ७ विषय क्रमांक- ३

दिनांक- ३/१०/२०१७

सूचक- मा.उषा वाघेरे अनुमोदक- मा.निकीता कदम

संदर्भ – मा. उषा वाघेरे यांचे दि. २०/०९/२०१७ चे पत्र.

मा.उषा वाघेरे यांनी सादर केलेल्या पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मध्ये रहदारी तसेच मुख्य खालील दर्शविलेल्या चौकामध्ये CCTV कॅमेरा बसवुन मिळणेबाबत मान्यता देणेत येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | पॉवर हाऊस चौक | १२ | पवनेश्वर मंदिर चौक |
| २ | साई चौक | १३ | जलतरण तलाव रस्ता |
| ३ | शगुन चौक | १४ | बालामल चाळ |
| ४ | डिलक्स चौक | १५ | माळी आळी, समाधान चौक |
| ५ | जयहिंद स्कुल चौक | १६ | भिमनगर |
| ६ | अशोक थिएटर चौक | १७ | प्रभागातील झोपडपट्टी एरिया |
| ७ | भैरवनाथ मंदिर चौक | १८ | गंगवा चौक |
| ८ | नाणेकर कॅम्प चौक | १९ | प्रभागातील सर्व बालउद्यान |
| ९ | न्हावी आळी चौक | २० | शाळा (मनपा) |
| १० | सौंदर्य चौक | २१ | स्मशान भुमी चौक |
| ११ | पवनेश्वर मंदिर चौक | | |

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - ८ विषय क्रमांक- ४

दिनांक- ३/१०/२०१७

सूचक- मा.संदिप वाघेरे अनुमोदक- मा.निलेश बारणे

संदर्भ – मा. संदीप वाघेरे यांचे दि. २८/०९/२०१७ चे पत्र.

मा.संदीप वाघेरे यांनी सादर केलेल्या पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मध्ये असलेल्या विविध आरक्षणास नामकरण करणेबाबत मान्यता देणेत येत आहे.

१) पवनेश्वर मंदिराजवळील नदीवरील पुल – कै.नानासाहेब हरिभाऊ नाणेकर (मास्तर) पुल

२) पवनेश्वर मंदिराजवळील आरक्षण क्रमांक १६२ (प्ले ग्राऊंड) महात्मा ज्योतिबा फुले क्रीडा संकुल

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

**सभा कामकाजात ऐनवेळी दाखल करुन घेणेत आलेले विषय खालीलप्रमाणे**

ठराव क्रमांक - ९ विषय क्रमांक- ५

दिनांक- ३/१०/२०१७

सूचक- मा.चंद्रकांत नखाते अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.चंद्रकांत (आण्णा) बारकु नखाते यांचे दि. ०३/१०/२०१७ चे पत्र.

गाव मौजे रहाटणी सर्व्हे नं.२८ मध्ये विकसीत झालेल्या छत्रपती संभाजी महाराज उद्यान हे कै.एकनाथ नामदेव नखाते, कै.पंडीत नामदेव नखाते, कै.रंगनाथ नामदेव नखाते, कै.वामन नामदेव नखाते या शेतक-याच्या जमिनीवर झालेले आहे. सदरचे उद्यान विकसीत झाले त्यावेळी त्यांच्या वारसांनी आजीचे नाव कै.रुक्मिणी नामदेव नखाते उद्यान असे नाव ठेवण्यात यावे, असे त्यावेळेस नगरसदस्य यांना सुचविले होते, परंतु त्यावेळेसच्या सदस्यांनी छत्रपती संभाजी महाराज उद्यान असे नाव दिले.

परंतु त्याच उद्यानामध्ये एक अंदाजे ३० x ४० फुट मापाचे सभागृह/हॉल बांधणेत आला आहे. तरी सदरच्या सभागृहास/हॉलला अद्याप कोणतेही नाव दिलेले नाही. तरी सदरच्या सभागृहाला /हॉलला वरील व्यक्तींची मुले (वारस) श्री.बाळासाहेब पंडीत नखाते व इतर यांच्या मतानुसार सदर सभागृहाला/हॉलला कै.रुक्मिणी नामदेव नखाते सभागृह/भवन/हॉल/विरंगुळा केंद्र असे नाव देण्यात यावे. सदरच्या विषयासंदर्भात सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता विषय मंजुर करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

दि.३/१०/२०१७ रोजी दुपारी २.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे मासिक सभेत खालीलप्रमाणे मा.नगरसदस्यांनी चर्चा केली.

मागील दि. ४/०९/२०१७ रोजी झालेल्या सभेतील कामांचा आढावा घेणेत आला.
कचरा कुडी असलेल्या ठिकाणी सी.सी.टी.व्ही कॅमेराज बसविणेबाबत तरतुद टाकणेत येईल.
श्री.संदिप वाघेरे – प्रभाग क्र.२१ येथील संडास ब्लॉक न पाडणेबाबत २० महिलांनी पत्र दिलेले आहे. सदर स्वच्छता गृह पाडणेत येऊ नये.
श्रीमती उषा वाघेरे – सदर ठिकाणी आरोग्य अधिकारी यांनी पाहणी करावी.
सी सी टी व्ही कॅमेरा बसविणेबाबत तरतुद नसल्याने त्याबाबत प्रस्ताव तयार करा. आम्ही मा.आयुक्त यांच्याशी चर्चा करु.
श्री.संदिप वाघेरे – प्रभाग क्र.२१ येथील पवनेश्वर मंदिराजवळील पुलाचे नामकरण करण्यात यावे तसेच आरक्षण क्र.१६२ येथे असलेल्या प्ले ग्राऊंडचेही महात्मा ज्योतिबा फुले क्रीडा संकुल असे नामकरण करण्यात यावे.
श्रीमती अर्चना बारणे – प्रभाग क्र.२३ पडवळ नगर, ड्रायव्हर कॉलनी येथे दुषित पाण्याचा प्रश्न सुटलेला नाही.
सदर ठिकाणी Wash Out करणेचे काम सुरु आहे.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

अध्यक्ष
ग प्रभाग समिती
थेरगाव– ३३.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव - ३३
क्र-गक्षेका/कावि/२/११/२०१७
दिनांक - ३१ /१०/२०१७

प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)
क्षेत्रीय कार्यालय,
थेरगाव – ३३

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.